Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 223

# अर्थभारती

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक



**Guest Editor::**
Dr. Suresh B. Bijave
Pr ncipal,
Bhartiya Mahavidyalaya, Morshi
Dist.- Amarawati [M.S.] India.

**Executive Editor::**
Dr. Lajwanti R. Tembhurne
Head, Dept. of Economics,
Bhartiya Mahavidyalaya, Morshi
Dist.- Amarawati [M.S.] India

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
(Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

F r Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Changing Pattern and Composition of Employment and Unemployment in India | Dr. Samit Mahore, Dr. Dhiraj Kadam | 09 |
| 2 | Employment Scenario for Forthcoming 5 Years : An Outlook for India | Dr. Gajanan Patil | 15 |
| 3 | Recent Context of Current Employment Scenario in India | Dr. Raju Shrirame | 22 |
| 4 | Recent Employment Trends in India | Dr. Prashant Katole | 30 |
| 5 | विश्व व्यापार संगठन और भारत | डॉ. अर्चना जैन | 34 |
| 6 | वैश्विक मुक्त व्यापार और भारत | डॉ. प्रिती बंडे | 39 |
| 7 | सुधारोत्तर कालखंडात भारतीय श्रमशक्तीचा बदलता आकृतिबंध आणि प्रवृत्ती संदर्भ जनगणनेच्या तथ्यांचा | डॉ. धीरज कदम, डॉ. समित माहोरे | 41 |
| 8 | जागतिक मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | प्रा. दिपक काळे | 49 |
| 9 | नियोजन जिल्ह्याचे,अभिसरण विकासाचे – अमरावती जिल्ह्याचे संदर्भात | डॉ. मधुकर ताकतोडे, डॉ. पंकज तायडे | 54 |
| 10 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | डॉ. सुनिल शिंदे | 62 |
| 11 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | डॉ. माणिक ठिकरे, डॉ. करमसिंग राजपुत | 68 |
| 12 | भारतातील रोजगाराचे बदलते स्वरूप | डॉ. जे. व्ही. गायकवाड | 74 |
| 13 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | प्रा. माधुरी राखुंडे | 79 |
| 14 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यश-अपयश | श्री. सुनिल घुगल | 85 |
| 15 | जागतिक व्यापार संघटना व भारत | प्रा. गजानन जाने | 93 |
| 16 | वर्तमान काळात भारतातील रोजगाराच्या स्वरूपातील बदल | डॉ. यु. बी. सांगोळकर | 98 |
| 17 | भारतातील श्रमशक्ती व रोजगाराचे बदलते स्वरूप | डॉ. रवि सोरते | 103 |
| 18 | मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | डॉ. महेंद्र गावंडे | 112 |
| 19 | मुक्त व्यापार आणि जागतिक व्यापार संघटना | डॉ. अविनाश निकम | 116 |
| 20 | भारतातील रोजगाराचे बदलते स्वरूप | डॉ. राजश्री रायभोग | 125 |
| 21 | जागतिक व्यापार संघटना आणि भारतातील फळ व्यापार | डॉ. निलम छंगाणी | 130 |
| 22 | ग्रामीण भागात संत्रा कलम व्यवसायामुळे रोजगाराचे बदलते स्वरूप | डॉ. प्रज्ञा निंभोरकर | 133 |
| 23 | जिल्हा नियोजन समिती : यवतमाळ जिल्हा | डॉ. सिध्दार्थ मेश्राम | 138 |
| 24 | जागतिक व्यापार संघटनेचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. स्वप्निल बोबडे, प्रा. रविंद्र शेंडे | 142 |
| 25 | ग्रंथालयातील रोजगाराचे बदलते स्वरूप | प्रा. अरविंद पाझारे | 146 |
| 26 | जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश | प्रा. अंकुश तुरखडे | 150 |
| 27 | जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ. आर. जी. टाले | 155 |
| 28 | जागतिक व्यापार,संघटना आणि भारतीय शेती क्षेत्र | प्रा. दिपाली पडोळे | 160 |
| 29 | वर्तमान काळातील रोजगाराचे स्वरूप व आर्थिक सिद्धांत | डॉ. सुरेश जगताप | 162 |
| 30 | जागतिक व्यापार संघटना : भारताचे यश-अपयश | डॉ. ममता साहू | 165 |
| 31 | जागतिक व्यापार संघटनेला मुक्त व्यापार व्यवस्थेत यश-अपयश | डॉ. संजय धनवटे | 168 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 223 : विदर्भ अर्थशास्त्र परिषद ४४ वे वार्षिक अधिवेशन विशेषांक
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश

डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात व्यापारी धोरणाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. या व्यापार धोरणावरच आंतरराष्ट्रीय व्यापार अवलंबून असतो. व्यापार विषयक धोरण हा एक आर्थिक धोरणाचाच भाग आहे. अपेक्षित परीणाम साध्य करण्यासाठी या धोरणाची आखणी केली जाते. देशाच्या अंतर्गत परिस्थितीचा विचार करून आर्थिक धोरणाशी सुसंगत अशा व्यापार धोरण ठरविले जाते. आर्थिक विकासासाठी कोणते व्यापार धोरण हितकारक व कोणते व्यापार धोरण अहितकारक याचा विचार करावा लागतो. त्यासाठी मुक्त व्यापार धोरण योग्य की संरक्षित व्यापार धोरण योग्य याचा निर्णय शासनाला घ्यावा लागतो.

देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या आर्थिक वृध्दिच्या प्रक्रियेला गती देण्याचे कार्य करीत असल्याने रॉबर्टसनने 'विदेशी व्यापार हे आर्थिक वृध्दिचे इंजिन आहे' असे मत मांडले आहे. रिकार्डो हे सुध्दा मुक्त व्यापाराचे पुरस्कर्ते होते. अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापार सर्व देशांना कसा फायदेशिर ठरतो, हे स्पष्ट करतांना त्यांनी मांडलेला तुलनात्मक परिव्यय सिध्दांत अर्थशास्त्रात मान्यता पावलेला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार हा दोन किंवा त्यापेक्षा अधिक देशामध्ये चालणारा व्यापार आहे. अनेक राष्ट्रांना देशाच्या आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार हा मुक्त असावा देशामध्ये आयात आणि निर्यात होणाऱ्या वस्तूवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नसावेत असे वाटते. आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधामुळे कोणत्याच देशाचा फायदा होत नाही. उलट राष्टाराष्ट्रांमध्ये वाद निर्माण होऊन त्याचे पर्यावसन हे संघर्षामध्ये होते हा इतिहास आहे. हे दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या परिणामामुळे लक्षात आले आहे.

## संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

१) जागतिक मुक्त व्यापाराच्या संकल्पनेची मांडणी करणे.
२) गॅट करार ते जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेचा आढावा घेणे.
३) जागतिक व्यापार संघटनेच्या यशापयशाचे मुल्यमापन करणे.

## संशोधनाचे गृहितक

१) संघटनेच्या अस्तित्वामुळे मुक्त व्यापाराच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.
२) सदस्य राष्ट्रांना संघटनेच्या सभासदत्वाचा फायदा झाला आहे.

## संशोधन पध्दती

प्रस्तूत शोधनिबंधाचा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटनेशी संबंधित असल्यामुळे शोधनिबंधाचे लेखन करतांना द्वितियक सामग्री संग्रहन पद्वतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. तथ्य संकलन करतांना विषयाशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, डब्लु. टी. ओ. वेबसाईड, इंटरनेटवर उपलब्ध माहिती, वर्तमानपत्रे व नियतकालीके इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

ISSN : 2348-7143
February-2020

**मुक्त व्यापाराचा अर्थ**

मुक्त व्यापार धोरणाचा पुरस्कार सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी केला. मुक्त व्यापार धोरणालाच खुले व्यापार धोरण किंवा व्यापार उदारीकरण असेही म्हटले जाते. परकीय व्यापारात ज्यावेळी सरकारची कोणत्याही प्रकारची बंधने नसतात. त्याला मुक्त व्यापार म्हणतात. मुक्त व्यापार धोरणात देशांतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार असा भेदभाव केला जात नाही. मुक्त व्यापार याचा सहज व सोपा अर्थ म्हणजे बंधनमुक्त व्यापार होय. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर आंतरराष्ट्रीय व्यापारावरचे निर्बंध काढणे किंवा शिथील करणे ज्यायोगे एका देशातून दुसऱ्या देशामध्ये माल किंवा सेवेचा प्रवाह सुरळीत राहतो. मुक्त व्यापार हे बाजारपेठेचे तंत्र आहे ज्यात वस्तू व सेवा, श्रम, भांडवल आणि उत्पादनाचे इतर घटक कोणत्याही व्यापार अडथळ्यशिवाय मुक्तपणे जाऊ शकतात.

**मुक्त व्यापाराचे फायदे**

आंतरराष्ट्रीय व्यापार हा कोणत्याही निर्बधाशिवाय असावा असे विचार सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी फार पूर्विच मांडले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात आलेल्या मंदी आणि बेकारीच्या सावटामध्ये अनेक राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेला संजीवनी देण्यासाठी मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन केले. मुक्त व्यापार धोरणामध्ये प्रत्येक राष्ट्र विशेषीकरणाचा अवलंब करून व उत्पादन साधनांचा कार्यक्षम वापर करून महत्तम उत्पादनाचा फायदा घेऊ शकतात. या व्यापार धोरणामुळे उद्योगांच्या स्पर्धात्मक शक्तीमध्ये वाढ होत असल्यामुळे स्वस्त व दर्जात्मक वस्तूंचा पुरवठा होतो. त्यामुळे कोणतेही राष्ट्र स्वस्त वस्तूंची आयात करून संसाधनांचा कार्यक्षम वापर करू शकतो याचा फायदा राष्ट्रासोबतच त्या राष्ट्रातील उपभोक्त्यांनासुध्दा होतो. या व्यापार धोरणामुळे अकार्यक्षम उद्योग सपर्धेमधुन बाहेर फेकले जातात. जागतिक स्पर्धेमुळे मक्तेदारीवर प्रतिबंध येते. वस्तू व सेवांच्या बाजारपेठांचा विस्तार होत जातो. राष्ट्राराष्ट्रामधील आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ होते. मुक्त व्यापार धोरणामुळे विकसनशिल देशाच्या आर्थिक विकासाला गती येऊन या देशातील बेकारी, दारीद्र्य यासारख्या समस्या कमी होण्यास हे धोरण उपयुक्त ठरते.

**मुक्त व्यापार, गॅट करार ते जागतिक व्यापार संघटना**

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर बहुतेक सर्व राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या होत्या. देशादेशांतील व्यापारावर प्रचंड निर्बध लावले गेले होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार फार कमी झाला होता. जगात मंदी आली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी जागतिक व्यापारामध्ये मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारले पाहिजे अशी भावना अनेक राष्ट्रांमध्ये रूजायला लागली. यासाठी मुक्त व्यापार धोरणामध्ये एकत्र येणाऱ्या सदस्य राष्ट्रांच्या दरम्यान एक व्यापारी करार करण्याची गरज निर्माण झाली. या करारात सहभागी सर्व राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय बाजारात समान संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने व्यापारावरील प्रशुल्क (आयात कर) व इतर बंधने कमी करून परस्पर लाभ सर्व राष्ट्रांना प्राप्त करून देणे व आंतरराष्ट्रीय व्यापारातून कोणा एका राष्ट्राला झुकते माप न देणे या उद्देशाने ३० ऑक्टोंबर १९४७ रोजी २३ राष्ट्रांनी एकत्र येऊन जिनिव्हा या ठिकाणी एक करार केला. या कराराला संक्षेपाने गॅट असे संबोधले जाते हा करार १ जानेवारी १९४८ रोजी कार्यान्वित झाला.

कालांतराने गॅटमध्ये अनेक दोष निर्माण झाले. काही राष्ट्रांनी यामध्ये सामिल व्हायचे नाकारले. गॅटच्या आजपर्यंत व्यापारविषयक चर्चेच्या १९४७ ते १९९३ या दरम्यान आठ बैठका झाल्यात या बैठकांना फेऱ्या असे

म्हणतात. सन १९४७ मध्ये पहिल्या फेरीत २३ देशांना समावेश होता. १९४९ मध्ये अनेशी येथिल दुसऱ्या फेरीत १३ देशांचा समावेश होता. १९५१ मध्ये टोर्के येथिल तिसऱ्या फेरीत ३८ देशांचा समावेश होता. १९५६ मधील जिनिव्हा येथिल चौथ्या फेरीत २६ देशांचा समावेश होता. पाचवी फेरी जी. दिल्लन फेरी म्हणून ओळखली जाते. या फेरीत २६ देशांचा समावेश होता. १९६४ मध्ये जिनिव्हा येथिल सहाव्या फेरीत ६२ देशांचा समावेश होता. ही १९६७ ची फेरी केनेडी फेरी म्हणून ओळखली जाते. १९७३ मध्ये जिनिव्हा येथिल सातव्या फेरीत १०२ देश सामील झाले होते. आठवी फेरी ही जिनेव्हा येथेच संपन्न झाली. यामध्ये १२३ देश सामील झाले होते. १९९३ मधिल या फेरीला उरूग्वे फेरी म्हटले जाते. यातून जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती झाली.

गॅट ही १९४८ पासून जागतिक व्यापाराचे नियमन करणारी तात्पुरत्या स्वरूपाची अनौपचारीक संघटना होती. त्यामुळे गॅटच्या सदस्य राष्ट्रांनी १५ एप्रिल १९९४ मध्ये मोरोक्कोमधील मर्राकेश या ठिकाणी गॅटच्या जागी एक नवी संघटना स्थापन करण्याचा करार संमत केला व या कराराद्वारे १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटना या ऐतिहासिक संस्थेची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय कराराने स्थापन करण्यात आलेली ही कायमस्वरूपी संघटना आहे. भारत हा १९४७ च्या गॅट करारात संलग्न सभासद देश होता. आणि जागतिक व्यापार संघटनेतही संस्थापक सदस्य देश आहे.

**जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे**

१. सदस्य राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे.
२. रोजगारात वाढ घडऊन आणणे.
३. वस्तूंचे उत्पादन आणि व्यापार वाढण्यासाठी प्रयत्न करणे.
४. सेवांचे उत्पादन आणि व्यापार वाढण्यासाठी प्रयत्न करणे.
५. जागतिक संसाधनांचा पर्याप्त वापर होईल असे पाहणे.
६. शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा स्वीकार.
७. पर्यावरण संवर्धन

**जागतिक व्यापार संघटनेच्या महत्वाच्या तरतुदी**

१. विकसनशिल तसेच अल्पविकसित देशांसाठी उदारीकरणाच्या दबावाची निती वापरली जात नाही.
२. अशा देशांना उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी जास्त वेळ किंवा मुदत दिली जाते
३. विकसनशिल देशांनी विकसित देशांना सवलती देतांना त्या विकसित देशांना इतरांना दिलेल्या सवलतींशी तंतोतंत मिळाल्या पाहिजेत असे नाही.
४. विकसित देशांना काही सुविधा उपलब्ध नाहित, मात्र त्या निम्न विकसित देशांना आहे. या सवलती आर्थिक एकत्रिकरण या नावाने ओळखल्या जातात.
५. विकसनशिल देशातील व्यापाराचा सहभाग वाढावा यासाठी, त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक व्हावे यासाठी तातिक अडथळे दुर करण्याची तरतुदही करारात करण्यात आलेली आहे.
६. विकसनशिल देशांचे हितसंबंध जपण्याची जबाबदारी विकसित देशांवर टाकण्यात आलेली आहे. जबाबदारीने भान ठेवूनच त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर काम केले पाहिजे.

७. विकसनशिल अविकसित प्रदेशात एखादा प्रकल्प उभारतांना स्थानिक आरोग्य, पर्यावरण यांची पुरेशी काळजी घेतील पाहिजे. दूरसंचार सुविधांचे जाळे उभारण्यासाठी मदत केली पाहिजे.

जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व ज्या ज्या देशांनी पत्करले आहे. त्यातील ३/४ पेक्षा जास्त राष्ट्रे निम्न विकसित, विकसनशिल आहेत. त्यामुळे बहुसंख्याकांचे हित जपण्यासाठी वरील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तंटे वादविवाद निकालात काढता यावेत यासाठीसुध्दा तरतुदी आहेत.

## जागतिक व्यापार संघटनेचे यश

जागतिक व्यापार संघटनेच्या अस्तित्वामुळे सदस्य राष्ट्रांमध्ये व्यापार करण्याचे प्रमाण व जागतिक उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वस्तू, सेवा, भांडवल आणि कृषीमाल यांच्या व्यापारात मोठी वाढ झाली. आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनावश्यक अडथळे बऱ्याच प्रमाणात दुर झाले असून व्यापाराची व्याप्ती वाढली आहे. सदस्य राष्ट्रांमध्ये होणाऱ्या गुंतवणूकीचे प्रमाणही वाढले असून बौध्दिक संपदा अधिकाराचे रक्षण करण्यात संघटनेला यश आले आहे. बौध्दिक संपदा अधिकाराच्या संरक्षणामुळे संशोधनाला प्रोत्साहन मिळाले. आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्माण झालेल्या तक्रारीचे निवारण करण्यास संघटनेला बऱ्यापैकी यश आले आहे. विकसनशिल देशांच्या आर्थिक विकासाकरीता विकसित देशातील आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे. ही गरज संघटनेचे सदस्यत्व स्विकारल्यामुळे विकसनशिल राष्ट्रांना सहजपणे उपलब्ध झाले. जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य संख्येत वाढ झाली असून जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचा फायदा सदस्य राष्ट्रांना होत आहे. ह्या करारामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली असून जागतिकीकरणाचा लाभ सदस्य राष्ट्रांना होत आहे. संघटनेच्या कार्यामध्ये बऱ्यापैकी पारदर्शकता दिसून येते. जर एखाद्या देशाने आपले अंतर्गत धोरण बदलले आणि त्यामुळे परदेशी वसतूंच्या बाजारपेठेवर परिणाम होत असेल तर अशा धोरणाची माहिती त्या देशाने देणे बंधनकारक आहे. तर एखाद्या देशाने या कराराचा भंग केला तर इतर देश त्याविरूध्द तंटेविषयक यंत्रणेकडे दाद मागू शकतात.

## जागतिक व्यापार संघटनेचे अपयश

जागतिक व्यापार संघटना स्थापन करतांना जी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. त्या उद्दिष्टांची पुर्तता मागील विस वर्षामध्ये झालेली दिसून येत नाही. सदस्य राष्ट्रांमध्ये व्यापार हा मुक्त असावा. कोणत्याही सदस्य राष्ट्राने जागतिक व्यापार संघटनेच्या नियमावलीनुसार व्यापार करावा. अनावश्यक कोणतेही निर्बंध लादु नये. जेणेकरून व्यापार करतांना राष्ट्रांमध्ये वाद किंवा संघर्ष निर्माण होईल. परंतु मागील काही वर्षापासून सदस्य राष्ट्रांद्वारे मोठ्या प्रमाणात नियमाचे उल्लंघन होतांना दिसून येत आहे यावर नियंत्रण ठेवतांना जागतिक व्यापार संघटना हतबल असल्याचे दिसून येत आहे. जागतिक व्यापार संघटेवर मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्याच्या असलेल्या प्रभावामुळे जागतिक व्यापार संघटनेचे नियम बनविणे किंवा बदलने यामागे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा हात असतो. यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मक्तेदारीला वाव मिळत आहे. मोठ्या कंपन्यांच्या स्पर्धेमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हे उद्योग मोठ्या उद्योगांच्या स्पर्धेसमोर टिकाव धरू शकले नाही त्यामुळे या उद्योगांमध्ये रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याने पारंपारिक रोजगार संधी कमी झाल्या. नवीन रोजगार संधीचा लाभ घेण्यासाठी विशेष शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्ये आवश्यक झाली. आणि ती ग्रामीण जनता आत्मसात करू न शकल्याने तेथील बेरोजगारी वाढली.

## जागतिक व्यापार संघटनेपुढील आव्हाणे

जागतिक व्यापार संघटनेपुढील आव्हाणांचा विचार करता संघटनचे सभासद नसलेल्या राष्ट्रांना जागतिक व्यापार करारात सहभागी करून नियंत्रण मुक्त व्यापाराचे उद्दिष्ट साध्य करून घेण्याचे आहे. संघटनेच्या तत्वांच्या

अविरोधी व्यापार करणाऱ्या प्रादेशिक व्यापारी गट हे संघटनेच्या धोरणात्मक निर्णयामध्ये अडथळे निर्माण करतात. ते दुर करण्याचे आव्हाण आहे. विकसनशिल राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाकरीता जे धोरणे राबविले जात आहेत. त्या धोरणांमुळे मोठ्या प्रमाणात या देशात पर्यावरणाची समस्या निर्माण झाली आहे. या देशामध्ये विस्थापितांची समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विकसनशिल देशामध्ये श्रम कल्याण कायद्याचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत आहे. या देशामध्ये कमी मजूरी देऊन श्रमिकांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. बालकामगारांचा उद्योगात सर्रास वापर करून मानवाधिकाराचे उल्लंघन होत आहे. यावर संघटनेचे नियंत्रण दिसत नाही. वर्तमान जागतिक अर्थव्यवस्थेत जे मुलभूत बदल आपल्याला निदर्शनास येतात व ते म्हणजे सभासद देशावरील नियंत्रणात्मक धोरणाबाबत संघटनेला दिलेले अधिकार अपुरे असल्याचे दिसून येते. म्हणूनच संघटनेच्या नियंत्रणात्मक कार्यावर काही प्रमाणात मर्यादा दिसून येतात.

उपसंहार

आजतिमीस जगातिल बहुसंख्य देश जागतिक व्यापार संघटनेचे सभासद देश आहेत. चांगल्या आणि वाईट परिणामांचा विचार करून जागतिक स्तरावरील बहुसंख्य प्रमुख राष्ट्रांनी जागतिक व्यापार संघटनेचे सभासदस्व स्विकारले आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या सहभागाशिवाय आज कोणत्याही देशाचे अस्तित्व हे जवळपास शुन्य आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या अस्तित्वामुळे अनेक राष्ट्रांना आयात आणि निर्यातीवरील सदस्य राष्टांच्या आयातीवरील लावलेले निर्बध कमी करावे लागले दृ संघटनेच्या अस्तित्वामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बध शिथिल झाले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात पारदर्शकता येवून बौध्दिक संपदा अधिकार कायद्याच्या कवचामुळे संशोधनाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिकीकरणाला गती आली. बाजारपेठांचे स्वरूप व्यापक झाले आहे. ऑनलाईन बाजारामुळे लोकांना घरबसल्या दर्जेदार वस्तू व सेवा प्राप्त होत आहे. असे असले तरी जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतरच्या सुरवातीचे महत्व आज राहिले नाही हे वास्तव आहे. आजही आंतरराष्ट्रीय व्यापारावर आणि संघटनेच्या कामकाजात अमेरिका व युरोप खंडातील काही मोठ्या राष्ट्रांचा प्रभाव आहे. विकसित आणि विकसनशिल देशांमधील आर्थिक व सामाजिक दरी संघटनेच्या कार्यपद्वतीतून वाढली आहे. संघटनेचे कोणतेही निर्णय लवकर होतांना दिसून येत नाही. तसेच कामगार कल्याण आणि पर्यावरण याबाबत संघटनेमध्ये अनास्था आहे. असे आरोप संघटनेवर केले जातात. अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जागतिक व्यापार संघटनेच्या करारांचे उल्लंघन करून त्यांनी स्टील व अल्युमिनियमवर वाढीव कर बसविले आहेत. हे कर सुरक्षिततेसाठी आवश्यक असल्याचे सांगून या कृत्यास नैतिक आधार देण्याचा प्रयत्नही त्यांनी केला आहे. जागतिक व्यापार संघटना ही स्वत:च्या उदिष्टानुसार काम करू शकली पाहिजे यासाठी मोठ्या राष्ट्रांचा प्रभाव संघटनेने झुगारला पाहिजे आणि गरीब व विकसनशिल राष्ट्रांना जास्तीतजास्त फायदा कसा होईल यादष्टीने काम केले पाहिजे. विकासाच्या आड गरीब व विकसनशील राष्ट्रातील गरीब, विस्थापीत व मजुरांची जी पिळवणूक होत आहे व पर्यावरणाची जी अतोनात हानी होत आहे. ही थांबविण्यासाठी कठोर पाऊले उचलायला पाहीजे.

संदर्भ

१. गंगवाल सुभाष : (२००४) डब्लु. टी. ओ. एवं भारत चुनोतियॉए, मंगलदीप पब्लिकेशन, जयपूर
२. डोळे डॉ. ना. य. : उदारीकरण नवे आर्थिक धोरण, विद्या प्रकाशन, नागपूर–१९९७

३. पाटील डॉ. डी. जी. : भारतीय अर्थव्यवस्था–एक दृष्टीक्षेप, प्रशांत पब्लिकेशन–२०१२
४. कराडे प्रा. जगन : जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन सदाशिवपेठ, पुणे–२०१२
५. खेर सी.प. : जागतिकीकरण समस्या, आशय, अनुभव, डायमंड पब्लिकेशन पुणे, २०११
६. खडाळ डॉ. बी.जी. : भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००९
७. खेर सी.प. : जागतिक अर्थकारणाचे नविन संदर्भ, दिलीपराज प्रकाशन पुणे २००४
८. दुधाणी डॉ. पद्माकर : श्रीविद्या पकाशन, पुणे २०११
९. खादू गजानन : जागतिकीकरण परीणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई
१०. कराडे डॉ. जगन : जागतिकीकरण आणि भारतासंबंधी आव्हाण, डायमंड पब्लिकेशन सदाशिवपेठ, पुणे–२००८
११. योजना मासिक : फेब्रुवारी २०१
१२. दैनिक : लोकमत, सकाळ, नागपूर टाइम्स
13- https://www.wto.org/english/thewto_e/whatis_e/tif_e/fact1_e.htm
14- https://www.nytimes.com/topic/organization/world-trade-organization-trade-disputes

ISSN : 2348-7143
February-2020

३. पाटील डॉ. डी. जी. : भारतीय अर्थव्यवस्था–एक दृष्टीक्षेप, प्रशांत पब्लिकेशन–२०१२
४. कराडे प्रा. जगन :जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाणे, डायमंड पब्लिकेशन सदाशिवपेठ, पुणे–२०१२
५. खेर सी.प. : जागतिकीकरण समस्या, आशय, अनुभव, डायमंड पब्लिकेशन पुणे, २०११
६. खटाळ डॉ. बी.जी. : भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००९
७. खेर सी.प. : जागतिक अर्थकारणाचे नविन संदर्भ, दिलीपराज प्रकाशन पुणे २००४
८. दुभाषी डॉ. पद्माकर : श्रीविद्या पकाशन, पुणे २०११
९. खातू गजाजन : जागतिकीकरण परीणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई
१०. कराडे डॉ. जगन : जागतिकीकरण आणि भारतासंबंधी आव्हाण, डायमंड पब्लिकेशन सदाशिवपेठ, पुणे–२००८
११. योजना मासिक : फेबुवारी २०१
१२. दैनिक : लोकमत, सकाळ, नागपूर टाइम्स
13- https://www.wto.org/english/thewto_e/whatis_e/tif_e/fact1_e.htm
14- https://www.nytimes.com/topic/organization/world-trade-organization-trade-disputes